# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/01/2023 (शनिवार) सकाळ

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

## पोलीस स्टेशन मौदा व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कार्यवाही

**पो.स्टे. मौदा** :– पोलीस स्टेशन मौदा येथे यातील आरोपी नामे– इंद्रकुमार कलेश्वर चंद्रवंशी, वय १९ वर्ष, अडाम, पोस्ट आसरा ता. डोंगरगाव जि. राजनांदगाव (छत्तीसगढ) यांनी पोलीस स्टेशन मौदा येथे दिनांक २०/०१/२०२३ रोजी बनावट तक्रार दिली की, त्याचे सोबत असलेला ट्रक चालक कार्तिक सदाराम चंद्रवंशी, वय २४ वर्ष, रा. घर क्र. ६६ वार्ड क्र. ०४ हे सोबत ट्रक क्र. CG-08-AL-2316 घेवुन मौदा शिवारात आलीशान धाब्याजवळ ट्रक लावुन दोघेही दारू पिले यातील आरोपीने जेवन केले व ट्रक चालक व मृतक कार्तिक चंद्रवंशी परत दारू पिणेकरीता खाली उतरला. व परत १० ते १५ मिनीटांनी त्याचे डोक्याला रक्त लागलेल्या स्थितीत व शर्ट फाटलेले स्थितीत आपले ट्रक जवळ परत येवुन ट्रकचे कॅबिन मधुन २०,०००/–रू. असलेले पॅकीट घेवुन समोर जात असलेल्या ट्रक मध्ये बसुन निघुन गेला तो आजपर्यंत घरी किंवा ट्रन्सपोर्टमध्ये परत आला नाही. अशा तक्रारी वरून पोलीस स्टेशन मिसींग क्र. ०६/२०२३ दिनांक २०/०१/२०२३ रोजी २२.५४ वा. दाखल करून मौदा पोलीस शोध घेत असता

दिनांक गौतम सुर्यभानजी डबराशी, वय ३४ वर्ष, रा. अंबाडा देशमुख, ता. नरखेड जि. नागपूर ह.मु. कोठारी कोठारी फार्म हाऊस माथनी शिवार महामार्ग क्र. ५३ हे दिनांक २७/०१/२०२३ रोजी सकाळी कोठारी फार्म हाऊस येथील शेतातील पाणी ओलीत करण्याचे पाईप शेतात पाहत असता त्यांना महामार्ग क्र. ५३ ला लागुन असलेल्या शेताचे धुऱ्याचे भिंतीपासुन २५ फुट अंतरावर शेतात एक अनोळखी पुरूषाचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत दिसुन आल्याने त्यांनी डायल ११२ वर मौदा पोलीसांना माहिती दिली.

मौदा पोलीसांना माहीती मिळताच वरीष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत खराबे, सहायक पोलीस निरीक्षक सतीश सोनेकर, सपोनि प्रमोद चौधरी, पोउपनि जगदीश बिरोले हे पोलीस कर्मचारी सह कोठारी फार्म हाऊस येथील शेतात पोहचुन प्रेताची पाहणी करून प्रताचे कवठी वर माराचे निशान दिसुन आल्याने वरीष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत खराबे यांनी मा. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री मुख्तार बागवान यांना माहीती दिली. सदर प्रेताचे कपडे व वर्णन हे दिनांक २०/०१/२०२३ रोजी पोलीस स्टेशन मध्ये दाखल असलेल्या मिसींग सोबत मिळते असल्याने हरविलेल्या इसमाचा भाऊ घसीयाराम सदाराम चंद्रवंशी (सोनकुकरा) याला फोन करून माहीती देवुन मिसींग तक्रार देणारा इंद्रकुमार कलेश्वर चंद्रवंशी, वय १९ वर्ष, रा. याला घेवुन येण्यास सांगितले. घसीयाराम सदाराम चंद्रवंशी यांनी प्रेत पाहताच ते प्रेत त्याचा भाऊ नामे– कार्तिक सदाराम चंद्रवंशी वय २४ वर्ष चे असल्याचे ओळखले.

तसेच मिसींग तक्रार देणारा याचे वर संशय असल्याने त्यास मा. पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग व वरीष्ठ पोलीस निरीक्षक मौदा, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार भास्कर मेटकर, मनोहर जंगवाड, हरीष यंगलवार, पोलीस नायक दिपक दरोडे,

रोशन पाटील, अजय वाघमारे, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार विनोद काळे , ईकबाल शेख, नाना राऊत, यांनी विश्वासात घेवुन सखोल विचारपूस केली असता मिसींग तक्रार देणारा इंद्रकुमार कलेश्वर चंद्रवंशी, वय १९ वर्ष याने मृतकाच्या खात्यात असलेल्या पैशाचे प्रलोभना वरून मौदा शिवारात मृतक दारूचे नशेत असतांना ट्रक मौदा शिवारात उभा असतांना ट्रकचे कॅबिन मध्ये लोखंडी रॉडने डोक्यावर मारून त्याचा खुन केल्याची कबुली दिली आहे. खुन केल्यानंतर मृतकाचे खिशातुन २०,०००/—रू. तसेच एटीएम व्दारे खात्यातुन ४४,०००/—रू. काढल्याचे सांगितले.

मृतकाचे भावानी दिलेल्या रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपीचे विरोधात कलम ३०२, २०१ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केलेला असुन पुढील तपास वरीष्ठांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी पास्टे मौदा मो. नं. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर